# सोलापूर महानगरपालिका
## सभेचा इतिवृत्तांत
## (मा.सर्वसाधारण सभा संदर्भ)
## उप-समिती बैठक क्रमांक - ५३

महानगरपालिका, जा.क्र.नआ/वै/९११ मा.आयुक्त कार्यालय दि. ११.०३.२०२२ रोजीच्या मा.प्रशासकसो यांच्या आदेशाने मा.अति.आयुक्त, मा.मुख्यलेखापरिक्षक, नगरसचिव व विषयाशी संबंधित विभागाचे खातेप्रमुख/सहा.आयुक्त, यांची उप-समिती गठीत करणेत आली आहे. सदर प्रस्तावा बाबत प्रशासकीय दप्तरी ठराव करणेकामी मा.उपसमितीचे शिफारसी करिता दि.७.१०.२०२२ रोजी सभा क्रमांक ५२ चे कामकाज संपलेनंतर मा.अति.आयुक्त यांचे कार्यालय येथे बैठक बोलाविणेत आली होती.
सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

| अ.क. | अधिकारी/ कर्मचारी | हुद्दा |
|---|---|---|
| १ | मा.श्री.विजय खोराटे | अतिरिक्त आयुक्त |
| २ | मा.श्रीमती.रुपाली कोळी | मुख्यलेखापरिक्षक/ मुख्यलेखापाल |
| ३ | मा.श्री.प्रविण दंतकाळे | नगरसचिव |
| ४ | मा.डॉ.मंजिरी कुलकर्णी | आरोग्य अधिकारी |
| ५ | मा.श्री.संजय धनशेट्टी | सार्व.आरो.अभियंता |

| अ.क्र | विषय क्रमांक | विषयाचा तपशील | संबंधित खातेप्रमुख / सहा.आयुक्त | मा.प्रशासक यांचेकडे विषया संबंधी निर्णय घेणे कामी उपसमितीची शिफारस |
|---|---|---|---|---|
| १ | १०१ | वैद्यकिय सेवा मिळणेबाबत सादर करण्यात येणाऱ्या विविध सामाजिक व स्थानिक संस्थेच्या निवेदनाप्रमाणे योग्यत ती सेवा शुल्क आकारून वैद्यकिय सेवा देणेकरीता वैद्यकिय अधिकारी व कर्मचाऱ्यांचे एक दिवसाची वेतन हेच माफक शुल्क आकारणी करणेकरीता खालील वैद्यकिय सुविधा पथक व त्यांची एक दिवसाची वेतन खालील तक्त्यात नमूद आहे.<br><br>अ.क्र / वैद्यकिय अधिकारी व सेवक / एक दिवसाची होणारी रक्कम<br>१ / वैद्यकिय अधिकारी / २५००/-<br>२ / मिश्रक / २४००/-<br>३ / नर्स / ६००/-<br>४ / आशा वर्कर (२) / १०० x २ = २००/-<br>५ / ड्रायव्हर / १५००/-<br>एकुण रक्कम / ७२००+ डिझेल खर्च<br><br>तरी सदर वैद्यकिय सेवा पुरविण्याकरीता येणाऱ्या खर्चास जेवढे दिवस सेवा मागतील त्याप्रमाणे प्रत्येक दिवसाचा खर्च वरील प्रमाणे आकारणी केल्याप्रमाणे भरून घेऊन कारवाई टेवणेबाबत धोरणत्मक निर्णय घेणेबाबत व सदर शुल्क रक्कम आरोग्य विभागाकडील | आरोग्य अधिकारी | **प्रकरणाचे अवलोकन केले, प्रस्तावित प्रमाणे प्रतीदिन प्रथम १० कि.मी. साठी र.रु.३०००/- आणि पूढील प्रत्येक कि.मी. साठी र.रु.२००/- प्रमाणे भाडे आकारणी करणेस मान्यता देण्यात येत आहे.** |

उ.स.बै.५३
पान ११३

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | खात्यावर जमा करून घेणेबाबत योग्य तो आदेश होण्यास व सेवा शुल्क आकारणीस तसेच प्रथम १० किमी साठी र.रु.३०००/- आणि पूढील प्रत्येक किमी साठी र.रु.४००/- प्रमाणे भाडे आकारणीस प्रस्ताव सर्वसाधारण सभेकडे पाठविणे आवश्यक आहे परंतू मा.सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने व मा.प्रशासक यांची नियुक्ती झाल्याने दि.११/०३/२०२२ ने गठीत झालेल्या उपसमितीमार्फत मा.प्रशासक यांचेकडे **धोरणात्मक निर्णयास्तव** पाठविणे कामी आयुक्त यांचे दि.२३/०९/२०२२ ने आलेले प्रकरण.**(ई-७४६४३)** **HEALTH** | | |
| २ | १०२ | दि.०२/१०/२०२१ रोजी केंद्र शासनाने अमृत २.० अभियानाची घोषणा केलेली आहे. राज्य शासनाने केंद्र पुरुस्कृत अमृत २.० अंमलबजावणीकरीता दि.१४/०७/२०२२ रोजी शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. सदर शासन निर्णयानुसार ड वर्ग महानगरपालिकेकरीता वित्तीय आकृतीबंध खालीलप्रमाणे आहे. | **सार्व.आरो. अभियंता** | **प्रकरणी प्रस्तावित प्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.** |

| अ. क्र. | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा प्रकार | केंद्र शासन हिस्सा (टक्के) | राज्य शासन हिस्सा (टक्के) | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा (टक्के) |
|---|---|---|---|---|
| १ | **"ड" वर्ग महानगरपालिका** | ३३.३३ | ३६.६७ | ३० |

अमृत १ अभियांना अंतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा २५ % होता तथापी अमृत २.० अभियांना अंतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा ३०% इतका टेवण्यात आलेला आहे. सध्या सोलापूर महानगरपालिकेची आर्थिक स्थिती बिकट असल्याने ३०% हिस्स्याची रक्कम भरणे आर्थिकदृष्ट्या शक्य नाही.

तरी अमृत २.० अभियांनाअंतर्गत निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील वित्तीय आकृती बंधानुसार "ड" वर्ग महानगरपालिकेच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा ३०% ऐवजी २५ % करणे बाबत शासन निर्णयाच्या पूर्नविचार होणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे शासनास प्रस्ताव सादर करणेकामी मा.सर्वसाधारण सभेची मंजूरी आवश्यक आहे परंतू मा.सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने व मा.प्रशासक यांची नियुक्ती झाल्याने दि.११/०३/२०२२ ने गठीत झालेल्या उपसमितीमार्फत मा.प्रशासक यांचेकडे **मंजूरीस्तव** पाठविणे कामी

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | मा.आयुक्त यांचे दि.०७/१०/२०२२ ने आलेले प्रकरण (ई-७७०६८) | | |

मा.सार्व.आरोग्य अभियंता
सोलापूर महानगरपालिका

मा.आरोग्य अधिकारी
सोलापूर महानगरपालिका

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

मा.मुख्यलेखापरिक्षक
सोलापूर महानगरपालिका

मा.अति.आयुक्त
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिका
प्रशासक ठराव
विषय क्र.१०१ ठराव क्र.१०१ दिनांक. ०७/१०/२०२२
(मा.सर्वसाधारण सभा संदर्भ )

१०१

वैद्यकिय सेवा मिळणेबाबत सादर करण्यात येणाऱ्या विविध सामाजिक व स्थानिक संस्थेच्या निवेदनाप्रमाणे योग्यत ती सेवा शुल्क आकारून वैद्यकिय सेवा पुरविण्याकरीता येणाऱ्या खर्चास जेवढे दिवस सेवा मागतील त्याप्रमाणे प्रत्येक दिवसाचा खर्च भरून घेऊन कारवाई ठेवणेबाबत धोरणत्मक निर्णय घेणेबाबत व सदर शुल्क रक्कम आरोग्य विभागाकडील खात्यावर जमा करून घेणेबाबत योग्य तो आदेश होण्यास व सेवा शुल्क आकारणीस प्रथम १० किमी साठी र.रु.३०००/- आणि पूढील प्रत्येक किमी साठी र.रु.४००/- प्रमाणे भाडे आकारणीस प्रस्ताव सर्वसाधारण सभेकडे पाठविणे आवश्यक आहे परंतू मा.सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने व मा.प्रशासक यांची नियुक्ती झ ाल्याने दि.११/०३/२०२२ ने गठीत झालेल्या उपसमितीमार्फत मा.प्रशासक यांचेकडे **धोरणात्मक निर्णयास्तव** पाठविणे कामी आयुक्त यांचे दि.२३/०९/२०२२ ने आलेले **प्रकरणाचे अवलोकन केले, प्रस्तावित प्रमाणे प्रतीदिन प्रथम १० कि.मी. साठी र.रु.३०००/- आणि पूढील प्रत्येक कि.मी. साठी र.रु.२००/- प्रमाणे भाडे आकारणी करणेस मान्यता देण्यात येत आहे.**

(प्रविण प्रे.दंतकाळे)
नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिका ★ मा.प्रशासक कार्यालय ★

(पि.शिवशंकर, भा.प्र.से.)
प्रशासक
सोलापूर महानगरपालिका

# सोलापूर महानगरपालिका
## प्रशासक ठराव
## विषय क्र.१०२ ठराव क्र.१०२ दिनांक. ०७/१०/२०२२
## (मा.सर्वसाधारण सभा संदर्भ )

१०२

दि.०२/१०/२०२१ रोजी केंद्र शासनाने अमृत २.० अभियानाची घोषणा केलेली आहे. राज्य शासनाने केंद्र पुरुस्कृत अमृत २.० अंमलबजावणीकरीता दि.१४/०७/२०२२ रोजी शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. सदर शासन निर्णयानुसार ड वर्ग महानगरपालिकेकरीता वित्तीय आकृतीबंध खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा प्रकार | केंद्र शासन हिस्सा (टक्के) | राज्य शासन हिस्सा (टक्के) | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा (टक्के) |
|---|---|---|---|---|
| १ | "ड" वर्ग महानगरपालिका | ३३.३३ | ३६.६७ | ३० |

अमृत १ अभियांना अंतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा २५ % होता तथापी अमृत २.० अभियांना अंतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा ३०% इतका ठेवण्यात आलेला आहे. सध्या सोलापूर महानगरपालिकेची आर्थिक स्थिती बिकट असल्याने ३०% हिस्स्याची रक्कम भरणे आर्थिकदृष्ट्या शक्य नाही.

तरी अमृत २.० अभियांनाअंतर्गत निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील वित्तीय आकृती बंधानुसार "ड" वर्ग महानगरपालिकेच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा ३०% ऐवजी २५ % करणे बाबत शासन निर्णयाच्या पूर्नविचार होणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे शासनास प्रस्ताव सादर करणेकामी मा.सर्वसाधारण सभेची मंजूरी आवश्यक आहे परंतू मा.सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने व मा.प्रशासक यांची नियुक्ती झाल्याने दि.११/०३/२०२२ ने गठीत झालेल्या उपसमितीमार्फत मा.प्रशासक यांचेकडे **मंजूरीस्तव** पाठविणे कामी मा.आयुक्त यांचे दि.०७/१०/२०२२ ने आलेले **प्रकरणी प्रस्तावित प्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.**

(प्रविण प्रं.दंतकाळे)
नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिका
मा.प्रशासक कार्यालय

(पि.शिवशंकर, भा.प्र.से.)
प्रशासक
सोलापूर महानगरपालिका